SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(असाधारण)

शनिवार, दिनांक २० सप्टेंबर, २०२५

अधिसूचना

क्रमांक : १७३/२०२५. दिनाक : २०/०९/२०२५.

विषय :- CGS व CBCS (PG) च्या विषयांना NEP-2020 (PG) च्या विषयांशी समकक्षता प्रदान करण्यात आल्यामुळे यापूर्वी दिलेल्या संधी रद्द करण्याबाबत.

संदर्भ :- १) अधिसूचना क्रमांक ३५/२०२४, दिनांक ०६.०४.२०२४
२) अधिसूचना क्रमांक ३६/२०२४, दिनांक ०६.०४.२०२४
३) अधिसूचना क्रमांक ३७/२०२४ दिनांक ०६.०४.२०२४
४) अधिसूचना क्रमांक ४०/२०२४, दिनांक ०६.०४.२०२४
५) अधिसूचना क्रमांक ५३/२०२४, दिनांक २९.०५.२०२४
६) अधिसूचना क्रमांक ५४/२०२४, दिनांक २९.०५.२०२४
७) अधिसूचना क्रमांक ५६/२०२४, दिनांक २९.०५.२०२४

सर्व संबंधितांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, प्राधिकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून शासनाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे पदव्युत्तर अभ्यासक्रमांना NEP-2020 चा अभ्यासक्रम लागू करण्यात आला असल्यामुळे पदव्युत्तर सी.जी.एस. व सी.बी.सी.एस. च्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उपरोक्त संदर्भ क्रमांक १,२,३,४,५,६ व ७ प्रमाणे संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

परंतु, शैक्षणिक सत्र २०२४-२०२५ पासून सत्र १ ते ४ चा पदव्युत्तर अभ्यासक्रम (शिखर संस्थांद्वारा संचालित पदव्युत्तर अभ्यासक्रम वगळून) NEP-2020 अन्वये कार्यान्वित झाल्यामुळे व त्याबाबतच्या समकक्षतेच्या अधिसूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आल्यामुळे/येत असल्यामुळे ज्या पदव्युत्तर सी.जी.एस. व सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमाच्या ज्या परीक्षांच्या संधी शिल्लक आहेत अशा सर्व परीक्षांच्या तसेच M.S.W. सी.जी.एस अभ्यासक्रमाच्या संधी या अधिसूचनेन्वये रद्द करण्यात येत आहे.

स्वा/-
(डॉ. अविनाश असनारे)
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.